ISO 9001 : 2015
ISO 14001 : 2015
ISO 27001 : 2013
ISO 45001 : 2018

जनेप प्राधिकरण
JNPA

# जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण
# JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई - 400707. Port Office : Administration Bldg., Sheva Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 : मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 :
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191 : मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 :
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081 : मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171 : हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • Email : info@jnport.gov.in

क्रमांक: जेएनपीए/ वाढवण/२०२४/ 1501 तारीख: २५/०१/२०२४

प्रति,

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB),
एमआयडीसी कॉलनी, तारापूर,
पालघर जिल्हा, महाराष्ट्र राज्य - ४०१५०४

विषय: पालघर जिल्ह्यात विनाशकारी प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार, शेतकरी, आदिवासी आदी भूमिपुत्र देशोधडीला लागणार असून पर्यावरणावर आणि पर्यावरणावर अवलंबून राहणाऱ्या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या जन सुनावणीच्या माध्यमातून सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहलावावर हरकती नोंदवून वाढवणं बंदर उभारणी कायमचे रद्द करण्यानाबत Clarification to the Major query raised by participant reg. Public herring.

संदर्भ: वैष्णवी अनिल दवणे यांचा अर्ज दि १७.०१.२०२४

आदरणीय महोदय,

आपण सादर केलेल्या हरकतींचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | वैष्णवी अनिल दवणे यांचा अर्ज दि १७.०१.२०२४ | हरकतींचा खुलासा |
|---|---|---|
| १. | १) भारतीय राज्यघटनेचे कलम २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण: अनुच्छेद २१ म्हणते की कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही." अशा प्रकारे, अनुच्छेद २१ हे दोन अधिकार सुरक्षित करते: जगण्याचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार.<br><br>२) भारतीय राज्यघटनेचे कलम ३९ उपजीविकेचे संरक्षण:- कलम ३९ (अ) | वाढवण बंदर अतिरिक्त वाहतूक हाताळण्यासाठी जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड द्वारे विकसित करण्याची योजना केंद्र शासनाच्या परवानगीने केली आहे. वाढवण येथे मोठे बंदर उभारण्याच्या भारत सरकारच्या कॅबिनेट मंत्रालयाच्या प्रस्तावाला १९ फेब्रुवारी २०२० रोजी तत्वता मंजुरी मिळाली. उपरोक्त प्रस्तावाचा आणि जेएनपीएने केलेल्या तपशीलवार सादरीकरणाचा योग्य विचार केल्यानंतर, पायाभूत सुविधा, सागरी नियमन क्षेत्र आणि इतर विविध प्रकल्पांसाठी तज्ञ |

| | | |
|---|---|---|
| | सूचित करते की नागरिकांना (पुरुष आणि स्त्रिया) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा अधिकार असेल. अशाप्रकारे, घटनेच्या निर्मात्यांना अशा आवश्यकतेची जाणीव होती आणि ते नागरिकांना मूलभूत जीवनावश्यक गरजा उपलब्ध करून देण्यास तयार होते, याचे द्योतक आहे.<br><br>३) भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद 51-A (9) पर्यावरणाचे संरक्षणः अनुच्छेद 51-A(g) म्हणते की, "जंगल, तलाव, नद्या आणि यासह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे हे भारतातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.<br><br>वर्तमान संदर्भात वरील लेखांचा सारांश खालील प्रमाणे देण्यात येत आहे;<br><br>१) पालघर जिल्ह्यातील शेती, मासेमारी, बागायती ह्या व्यवसायावर होणारा विपरीत परिणाम या बंदरामुळे निर्माण<br><br>होणाऱ्या समतुल्य रोजगार निर्मितीपेक्षा कैकपटीने अधिक आहे. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकाला त्याच्या उपजीविकेचे संरक्षण करण्यासाठी संरक्षण दिले आहे.<br><br>२) EIA आणि SIA च्या अहवालांनुसार, बंदर बांधकाम क्षेत्रात कोणतीही "गावठाणे" नसल्यामुळे कोणत्याही गावांचे विस्थापन होणार नाही, परंतु गावठाणांचा भाग नसलेली गावे आहेत या वस्तुस्थितीवर हे अहवाल मौन बाळगून आहेत. | मूल्यमापन समितीने या प्रकल्पाच्या संदर्भात संदर्भ अटी (ToR) ०७ ऑक्टोबर २०२० रोजी मंजूर केला. जहाज वाहतूक मंत्रालयाने १९ फेब्रुवारी २०२० रोजी भारतीय बंदर अधिनियमांतर्गत वाढवण बंदराची प्रमुख बंदर (मेजर पोर्ट) म्हणून अधिसूचना प्रकाशित केली आहे. या बंदरामुळे स्थानिक बेघर होणार नाहीत आणि कोणीही विस्थापित होणार नाही, तसेच त्यांच्या जमिनी, घरे व जागा संपादित केल्या जाणार नाहीत. केवळ रस्ते व रेल्वे मार्ग तयार करण्यासाठी अगदी मर्यादित जमीन योग्य मोबादला देवून अधिग्रहित केली जाईल. अंमलबजावणीसाठी गुंतवणुकीचा प्रस्ताव भारत सरकारच्या विचाराधीन आहे.<br>EIA हा अहवाल पर्यावरण संदर्भात आहे व SIA अहवाल हा सामाजिक आघात मूल्यांकावर आधारीत वाढवण बंदर समंधित आहे आणि त्या त्या विषयाचा सखोल अभ्यास नमूद केलेला आहे.<br>तसेच बंदर व बंदरा संबंधित इतर क्षेत्रात स्थानिकांना रोजगाराची व धंद्याची भरपूर संधी उपलबद्ध होणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तरी, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रकल्पाला स्थानिकांकडून कडाडून विरोध असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या उपरोक्त विषयानुषंगे जन सुनावणीला मी हरकत नोंदवित असून प्रस्तावित वाढवण बंदर र उभारणीला उभारणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी देऊ नये आणि ह्या बंदराला कायमचे रद्द करण्याची विनंती हह्या हरकती निवेदनाद्वारे करण्यात येत आहे. ह्याची नोंद महोदयांनी घ्यावी, हि नम्र विनंती. | |

हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर महत्वाचा असून मा. प्रधानमंत्री कार्यालयाच्या स्तरावर देखरेख ठेवली जात असल्याने या प्रकल्पाची शिफारस लवकरात लवकर पुढील मंजुरीसाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयकडे करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

हे पत्र अध्यक्ष (प्रभारी) यांच्या मान्यतेने जारी केले जाते.

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत
उप महाव्यवस्थापक (पयोवी)